तक्रार निवारण समिती
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३
Email- dfreandgremumbai@gmail.com

न्यायालयीन प्रकरण

क्र.मुंविमुं/त.नि.स/आदेश/२०२२/6642
दिनांक :- 4 JUL 2022

विषय- श्री.जितेंद्र कदम व इतर २४ प्रतिनिधी यांचे रिट याचिका क्रमांक (L) १५३४९/२०२१ मधील मा. उच्च न्यायालय यांचे दिनांक ०४/०८/२०२१ च्या अनुषंगाने समितीस सादर निवेदन.

संदर्भ- १) श्री. जितेंद्र कदम व इतर यांचा दि. २४/०८/२०२१ रोजीचे निवेदन.
२) रिट याचिका क्रमांक (L) १५३४९/२०२१ मधील मा. उच्च न्यायालय यांचे दिनांक ०४/०८/२०२१ रोजीचे आदेश.
३) दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजीचा शासन निर्णय.

- पूर्वपिठीका

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशाच्या अनुषंगाने विषयांकित निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात त्यांनी मुद्दे मांडले आहे.

१. प्रतिवादी शाळेतर्फे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 अन्वये फी निश्चिती करण्यासंदर्भात सन 2021-22 या वर्षात कायद्याचा भंग करण्यात आला आहे.
२. प्रतिवादी शाळेमार्फत कोविड-19 या परिस्थितीमध्ये पालकांना होणाऱ्या आर्थिक समस्येबाबत अडचणी असतानादेखील शालेय फीमध्ये कोणतीही सूट देण्यात

आलेली नाही. तसेच पालकांनी यादरम्यान वेळोवेळी मागणी करून देखील प्रतिवादी यांनी कोणतीही सूट दिलेली नाही.

३. अशा कोविड परिस्थितीमध्ये प्रतिवादी शाळेमार्फत बेकायदेशीर फी निश्चिती करून फी वसूली केली असल्यामुळे या समितीने प्रतिवादी मार्फत निश्चित केलेली फी बेकायदेशीर ठरवून सदर फी थांबविण्यात यावी.

४. कोविड-19 या कारणास्तव शाळा बंद असल्यामुळे शाळेला इतर खर्च तसेच Annual charges, Picnic charges इ. वसूली केली जात आहे.

५. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 नमूद फी निश्चित झालेली नाही. या कायद्याचे कलम 9 प्रमाणे पीटीए व कार्यकारी समिती यांची पूर्वमान्यता घेतलेली नाही. म्हणजेच शाळेमार्फत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्याची अंमलबजावणी शालेय फी निश्चिती करताना संस्थेमार्फत केले जात नाही.

६. प्रतिवादी शाळा ही विनाअनुदानित स्वरुपाची असून शाळेची फी वसूली ही आर्थिक लाभ, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देताना आर्थिक लाभाचा उद्देश ठेवून केली जात असल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी संस्थेने साधारणत: 325 करोड रुपये इतका आर्थिक लाभ मिळविले असल्याचे तक्रारीत सादर केले आहे.

७. शासन निर्णय 8 मे 2020 अन्वये संस्थांना कोविड-19 या कारणास्तव फी वाढ न करण्याचे शासन आदेश असताना देखील संस्थेने नमूद शासन निर्णयाचे प्रतिवादी शाळेने पालन केले जात नसल्याचे निवेदन/तक्रार आहे.

८. सन 2020-21 व 2021-22 या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन पद्धतीने शिक्षण चालू असताना व अतिरिक्त खर्च शाळेला येत नसताना प्रतिवादी यांनी फी वाढ केलेली आहे.

९. निवेदनकर्ता यांनी सत्र शुल्क एस.एस. कोडबाबत नमूद करून त्याप्रमाणे सत्र शुल्क प्रतिवादी शाळेमार्फत घेतले जावे असे नमूद केले आहे.

इत्यादी स्वरुपाच्या तक्रारी प्रतिवादी यांच्याविरुद्ध निवेदन कर्ता यांनी निवेदनाद्वारे समिती समक्ष केलेल्या आहेत. तसेच त्यांनी खालीलप्रमाणे मागणी समिती समक्ष सादर केली आहे.

१. प्रतिवादी शाळेचे आर्थिक लेखापरीक्षण करण्यात यावे.

२. प्रतिवादी शाळेस मा. उच्च न्यायालयाचे 3 मे, 2021 इंडियन स्कूल, जोधपूर या प्रकरणात दिलेल्या आदेशाचे पालन प्रतिवादी शाळेमार्फत करण्यात यावे.

३. समिती समक्ष अर्जदार हे उपस्थित राहिल्यामुळे अर्जदार, पालक व विद्यार्थी यांना शाळेमार्फत यांची छळवणूक प्रतिवादी शाळेमार्फत करण्यात येणार नाही तथा त्यांचे मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचे आदेश समितीमार्फत देण्यात यावेत.

४. प्रतिवादी तर्फे सन 2020-21 व 2021-22 या वर्षी निश्चित करण्यात आलेली फी ही बेकायदेशीर असल्याने सदर प्रतिवादी संस्थेने निश्चित केलेली फी बेकायदेशीर ठरवून त्याआधारे फी वसूली करण्यास प्रतिवादी यांना प्रतिबंध करण्यात यावे.

५. प्रतिवादी शाळा यांना कायद्यान्वये पीटीए, पालक-शिक्षक संघ, कार्यकारी समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

६. अर्जदाराने सुनावणी समक्ष नमूद केले की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षात त्यांचे पाल्य व इतर विद्यार्थी यांचे मार्फत शालेय फी भरण्यात आली नाही त्यांचे शिक्षण संस्थेने ऑनलाईन बंद करण्यात आले होते.

७. त्याप्रमाणे अर्जदार यांनी सदय स्थितीत कोरोना कारणस्तव शाळा नियमित सुरू नसल्यामुळे शाळेला इतर खर्चामध्ये बचत होत आहे त्यास्तव प्रतिवादी यांनी फी मध्ये सूट मिळणेची मागणी केली आहे. त्यासंबंधी प्रतिवादी यांचे विरुद्ध कार्यवाही करावी.

८. त्याचप्रमाणे सुनावणीत अर्जदार यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०३ मे २०२१ रोजी इंडियन स्कूल जोधपुर विरूदश राजस्थान सरकार या आदेशान्वये प्रतिवादी शाळेमार्फत २० ते २५% फी कमी करणेबाबत आदेश होण्याची समितीस विनंती केली.

- दिनांक 29/09/2021 रोजीची प्रथम सुनावणी

संस्थेमार्फत दि. 29/09/2021 रोजीच्या सुनावणीस प्रतिवादी शाळेतर्फे श्रीम. आशा केसरकर, श्रीम. वर्षा दामले व शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभागामार्फत सहा. उपनिरीक्षक श्री. राजेंद्र पाटील हे उपस्थित होते. सुनावणीत त्यांनी तक्रार अर्जाची प्रत प्राप्त झाली नसल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रार कोणाशी संबंधित आहे व कशाशी संबंधित आहे? याची कल्पना नाही. तक्रारीची प्रत मिळाल्यास खुलासा सादर करू. त्याचप्रमाणे मुख्याध्यापक यांनी सुनावणी दरम्यान सुनावणीकरिता शाळेतर्फे वकील उपस्थित होवू देणेबाबत निवेदन समितीमध्ये सादर केले. समिती अर्धन्यायिक स्वरुपाची असल्याने, संबंधित समितीत उपस्थित मुद्दे हे विद्यार्थी, पालक व शाळा यांच्याशी संबंधित परिस्थितीवर अवलंबून असल्याने समितीचे कामकाज हे पूर्णत: अर्धन्यायिक अथवा कायदेशीर तरतूदींचा अर्थ लावणे यासंबंधित नसल्याने, समितीने प्रतिवादी यांचे विधिज्ञ उपस्थित राहण्याची परवानगी अर्ज नाकारला.

प्रतिवादी मुख्याध्यापक यांनी सुनावणी दरम्याने समितीचे अधिकार क्षेत्राबाबत प्राथमिक आक्षेप समितीसमक्ष सादर केले. सदर आक्षेपांची समितीने दखल घेवून या प्रकरणाच्या अंतिम आदेशात दखल घेण्याचे निर्देश देवून सदर सुनावणीकरिता नस्तीवर आक्षेप स्विकृत करण्यात आले.

1) निर्देश- अर्जदार यांना त्यांच्या तक्रारीची संपूर्ण प्रत प्रतिवादी मुख्याध्यापक यांना सादर करण्याचे निर्देश दिले.

2) सदर प्राप्त तक्रार अर्जावर प्रतिवादी मुख्याध्यापक यांनी आठ दिवसात आपला खुलासा समितीस सादर करण्याचे निर्देश दिले व त्याची प्रत अर्जदार यांनाही उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

3) वरील निर्देशान्वये माहिती प्राप्त झाल्यानंतर तक्रार पुढील सुनावणीत अंतिम आदेशाकरिता ठेवण्यात आली होती.

इत्यादी आदेश दिनांक २९/०९/२०२१ रोजीच्या सुनावणीत अंतरिम आदेश देण्यात आला होता.

- **दिनांक 01/02/2022 रोजीची सुनावणी**

दिनांक ०१/०२/२०२२ रोजी समितीमार्फत श्री. जितेंद्र कदम व इतर यांचे प्राप्त निवेदनावर पुन:श्च सुनावणी घेण्यात आली असून सुनावणीमध्ये श्री. नितीन दळवी रिट याचिका क्रमांक (L) १५३४९/२०२१ मधील प्रथम याचिकादार यांनी प्रतिवादी शाळेसंदर्भात मा. समितीने यापूर्वी देखील अंतरिम आदेश दिलेला असताना २८ विद्यार्थ्यांचे फी अभावी शिक्षण बंद केले असल्याने या निवेदन कर्त्यांसोबत त्यांच्याही तक्रारीचा SU-MOTO (स्वाधिकारे) दखल घेणेबाबत समितीला विनंती केली. त्यावर प्रतिवादी संस्थेमार्फत उपस्थित प्रतिनिधी यांनी त्रयस्त अर्जदार श्री. नितीन दळवी यांच्या निवेदनावर आक्षेप घेवून या समितीला केवळ विद्यार्थी व पालक यांच्या प्राप्त तक्रारीवर दखल घेण्याचा अधिकार असल्याचे नमूद करून श्री. नितीन दळवी त्रयस्त अर्जदार यांनी उपस्थित केल्याप्रमाणे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यात आले नसल्याचे समितीला सांगितले. तसेच सदर विद्यार्थ्यांच्या पालकांतर्फे त्यासंबंधी परस्पर तक्रार दाखल करण्याचा त्रयस्त अर्जदार श्री. नितीन दळवी यांना अधिकार प्राप्त होत नसल्याचे देखील समितीस सांगितले. तरी याबाबत स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करून शहानिशा करून प्रतिवादी शाळेमार्फत नमूद विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यात आले किंवा नाही याची पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. तसेच पडताळणीत प्रतिवादी शाळेमार्फत विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद केल्याचे आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे शिक्षण पुनस्थापित करण्याचे आदेश समितीने शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग यांना देण्यात आलेले आहेत. तसेच या सुनावणीत त्रयस्त अर्ज म्हणून श्री. नितीन दळवी यांनी सादर केलेले निवेदन समितीने दिनांक

०१/०२/२०२२ रोजीच्या या प्रकरणाच्या अंतरिम आदेशान्वये निकाली काढलेले आहे.

**श्री. नितीन दळवी यांचा दिनांक १७/०९/२०२१, दिनांक १२/१०/२०२१ व दिनांक ०४/०१/२०२२ रोजीच्या तक्रार अर्ज अनुषंगाने मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडून समितीस प्राप्त झालेले अर्ज.**

समितीस श्री. नितीन दळवी यांचे मार्फत प्रतिवादी शाळेसंदर्भात मा. शिक्षण उपसंचालक यांना प्राप्त झालेल्या तक्रारी बाबतची निवेदने श्री. जितेंद्र कदम व इतर यांचे निवेदनासोबत सुनावणीकरिता दिनांक ०२/१२/२०२१ व ०५/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. शिक्षण उपसंचालक यांनी समितीला सादर केली होती. श्री. नितीन दळवी यांचे दिनांक १७/०९/२०२१, दि. १२/१०/२०२१ व ०४/०१/२०२२ रोजीचे तक्रार अर्ज हे मा. शिक्षण उपसंचालक यांचे कार्यक्षेत्रांतर्गत प्रशासकीय कार्यवाही संदर्भात असल्याने सुनावणी घेवून कार्यवाही करणे या समितीचे कार्यक्षेत्रात येत नाही इ. बाब नमूद करून श्री. नितीन दळवी यांचे दिनांक १७/०९/२०२१, दि. १२/१०/२०२१ व ०४/०१/२०२२ रोजीचे तक्रार अर्ज समितीने सुनावणी घेता दिनांक ०१/०२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये मा. शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडे परत करण्यात आलेले आहेत. त्यास्तव श्री. नितीन दळवी यांचे प्रतिवादी शाळे संदर्भातील अर्ज समिती समक्ष सुनावणीस्तव अथवा निर्णयास्तव या समिती समक्ष प्रलंबित नाहीत.

याप्रमाणे समिती समक्ष उपरोक्त प्रमाणे सुनावणी झाल्या असून दिनांक २९/०९/२०२१ व ०१/०२/२०२२ रोजीचे अंतरिम आदेश समितीने विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित होवू नये म्हणून दिलेले आहेत व त्याचे अंमलबजावणीचे निर्देश ही संबंधित विभागातील शिक्षण निरीक्षक यांना दिलेले आहेत.

समितीने अर्जदार व प्रतिवादी यांना आपले म्हणणे व खुलासा सादर करण्याची वाजवी संधी उपरोक्त सुनावणीत देण्यात आली होती. अर्जदार यांनी

आपल्या निवेदनाआधारे आपले म्हणणे सादर केले असून प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवून देखील या प्रकरणात त्यांनी प्राथमिक अपेक्षा व्यतिरिक्त आपले लेखी म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे ही समिती वरील अंतरिम आदेशाद्वारे अर्जदार यांच्यातर्फे सादर निवेदने व या प्रकरणात नस्तीवर उपलब्ध असलेल्या दस्ताऐवजा आधारे उपस्थित पक्षांनी सुनावणीत सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे खालील मुद्दे निर्णयाकरिता विचारात घेण्यात येत आहेत.

- **निवेदन व कागदपत्राच्या आधारे समितीमार्फत विचारात घेण्यात आलेले प्रश्न/मुद्दे**

i. प्रतिवादी संस्था यांचे प्राथमिक आक्षेप अन्वये समितीला निवेदनकर्ता यांचे निवेदनावर दखल घेवून सुनावणी घेण्याचा अधिकार आहे का?

ii. संस्थेमार्फत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था फी नियामक कायदयान्वये PTA, EPTA गठित करण्यात आली नसून संस्थेमार्फत या कायदयांचे तरतुदींचे पालन करण्यात येत नाही का ?

iii. संस्थेमार्फत PTA, EPTA स्थापित नसताना संस्थेने निश्चित केलेली फी बेकायदेशीर आहे का ?

iv. तक्रारदार यांची PTA , EPTA व फी निर्धारणा संबंधी तक्रार विभागीय शुल्क नियामक समितीच्या अधिकारात येणा-या फी दरात विचार करण्याचे अधिकार क्षेत्राअंतर्गत आहे काय ? व या शासन निर्णय २६.०२.२०२१ अन्वये गठीत समितीला नमूद कायद्याच्या अंतर्गत तक्रारीची दखल घेण्याचा अधिकार आहेत का?

v. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात कोव्हिड परीस्थितीच्या कारणास्तोव शासन निर्णय ०८/०५/२०२० अन्वये अर्जदार यांच्या पाल्यास शालेय फी कमी करुन अथवा सवलत मिळण्याचा अधिकार आहे का ? तसेच तक्रारीत मागणी प्रमाणे या शासन निर्णयान्वये फी संबंधी ऑडीट करणे आवश्यक आहे का ?

vi. प्रतिवादी शाळेतर्फे सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील फी निश्चित करताना महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्याचा भंग करण्यात आला आहे का ?

vii. प्रतिवादी शाळेमार्फत कोविड-19 या परिस्थितीमध्ये पालकांना होणाऱ्या आर्थिक समस्येबाबत अडचणी असतानादेखील शालेय फीमध्ये कोणतीही सूट देण्यात आलेली नाही हे खरे आहे का ? तसेच पालकांनी यादरम्यान वेळोवेळी मागणी करून देखील प्रतिवादी यांनी कोणतीही सूट दिलेली नाही हे खरे आहे काय ?

viii. अशा कोविड परिस्थितीमध्ये देखील प्रतिवादी शाळेमार्फत बेकायदेशीर फी निश्चिती करून फी वसूली केली असल्यामुळे या समितीने प्रतिवादी मार्फत निश्चित केलेली फी बेकायदेशीर ठरवून सदर फी थांबविण्यात यावी. हे आदेश देण्याचे समितीला अधिकार आहेत का ?

ix. कोविड-19 या कारणास्तव शाळा बंद असल्यामुळे शाळेला इतर खर्च तसेच Annual charges, Picnic charges इ. वसूली केली जात आहे हे योग्य आहे काय?

x. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 नमूद फी निश्चित झालेली नाही. या कायद्याचे कलम 9 प्रमाणे पीटीए व कार्यकारी समिती यांची पूर्वमान्यता घेतलेली नाही. म्हणजेच शाळेमार्फत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्याची फी निश्चिती करताना संस्थेमार्फत केले जात नाही का ?

xi. प्रतिवादी शाळा ही विनाअनुदानित स्वरुपाची असून फी वसूली ही आर्थिक लाभ, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देताना आर्थिक लाभाचा उद्देश ठेवून केली जात असल्याचा तक्रारदार यांचे म्हणणे आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी संस्थेने 325 करोड रुपये आर्थिक लाभ मिळविले असल्याचे तक्रारीत सादर केले आहे.

xii. सन 2020-21 व 2021-22 या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन पद्धतीने शिक्षण चालू असताना देखील अतिरिक्त खर्च शाळेला येत नसतानला देखील शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून प्रतिवादी यांनी फी वाढ केलेली आहे.

xiii. अर्जदार यांनी सत्र शुल्क एस.एस. कोडबाबत नमूद करून त्याप्रमाणे सत्र शुल्क प्रतिवादी शाळेमार्फत घेतले जावे असे नमूद केले आहे.

<u>प्रश्न क्रमांक १ :-</u>

प्रतिवादी यांनी आपल्या प्राथमिक आक्षेपामध्ये –

a) 2021 in WP Stamp No. 95629 of 2020 (Association of Indian Schools & Anr. Versus the State of Maharashtra. .

b) WP No. 74597 of 2017 and WP (L) No. 471 of 2017.

c) Secretary , A.P.D Jain Pathshala and others, versus Shivaji Bhagwat Mote and others [ reported in (2011) 13 SCC 99 ]

d) Indian School, Jodhpur and Another versus State of Rajasthan and others [reported in (2021) SCC Online 359)].

e) Union of India v. Ranbir Singh Rathaur , [reported in (2006) 11 SCC 696]

f) Nusil Neville Wadia v. Ivory Properties [ reported in (2020) 6 SCC 557].

g) In M.L. Sethi v. R.P. Kapur , (1972) 2 SCC 427].

h) Amir Hassan Khan v. Sheo Baksh Singh [ Amir Hassan Khan v. Sheo Baksh Singh, 1884 SSC Online PC 13 : (1883-84) 11 IA 257 ].

i) Udayar v. Vasudeva Aiyar [Balakrishna Udayar v. Vasudeva Aiyar, 1917 SSC Online PC 32 : (1916-17) 44 IA .

j) N. S. Venkatagiri Ayyangar v. Hindu Religious Endowments Board [N.S. Venkatagiri Ayyangar v. Hindu Religious Endowments Board. Anisminic Ltd. v. Foreign Compensation Commission [Anisminic Ltd. v. Foreign Compensation Commission, (1969) 2 AC 147.

k) Foreshore Coop. Housing Society Ltd. [Foreshore Coop. Housing Society Ltd. v. Praveen D. Desai, (2015) 6 SSC 412 : (2015) 3 SSC (Civ) 333].

l) Meher Singh [ Meher Singh v. Deepak Sawhny, 1998 SCC Online Bom 452 : (1998) 3 Mah LJ 940 ].

m) Vishnu Javalkar , (2015) 7 SSC 321 : (2015) 3 SCC (Civ) 595].

इत्यादी मा. न्यायालयाचे वेगवेगळ्या आदेशांचे उल्लेख करून " It is therefore respectfully submitted that this Hon,ble Committee dose not have the jurisdiction to entertain, hear and decide/adjudicate on the present dispute." याप्रमाणे समितीस याचिकादार यांनी उपस्थित केलेल्या तक्रारीवर सुनावणी घेवून निर्णय घेण्याचे अधिकार या समितीस नसलयाचे लेखी खुलासाद्वारे प्राथमिक हरकत समितीसमक्ष सादर केली.

निवेदनकर्ते यांचे मार्फत सादर केलेले निवेदन हे मा. उच्च न्यायालय रिट याचिका क्रमांक (L) 15349/2021 मध्ये दिलेल्या निर्देशान्वये समितीसमोर सादर केलेले आहे तसेच ही समिती शासन निर्णय २६/०२/२०२० अन्वये विद्यार्थी व पालकांना नियमित येणाऱ्या अडचणी, चौकशी व निर्देश यावर दखल घेण्याचा समितीला अधिकार आहे.

**प्रश्न क्रमांक २ ते ४, ६ :-**

महाराष्ट्र शैक्षणिक संस्थेचा (शुल्क नियम) अधिनियमातील तरतूदीनुसार शाळेनी शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे, त्यासाठी संस्थेमार्फत PTA, EPTA स्थापन करणे आवश्यक आहे व सदर PTA, EPTA मार्फत मंजूर फी संस्थानी घेणे आवश्यक आहे. परंतू ज्या प्रकरणी या अधिनियमातील तरतूदीनुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता शाळांनी फी निश्चित करण्यात येत आहे असे संबंधित फी बाबत पालकांची तक्रार असल्यास अशा तक्रारी यथास्थितीचा कायद्यात नमूद "aggrieved parents group" means the group of parents of the children not be less than २५% of the total parents of the children

of effected standard or school , as the case may be, who are aggrieved by any decision under the Act" याप्रमाणे तरतूद आहे. या कायद्यान्वये उपलब्ध प्राधिकरणाचे अधिकार क्षेत्रावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला नाही.

**प्रश्न क्रमांक ५ :-**

सन २०२० — २०२१ या दरम्यान काळात शासनाने ऑनलाईन शिक्षण संबंधी शाळांना मार्गदर्शन सूचना देवून सर्व शाळांमध्ये सरसकट १५% शालेय फी कमी करणेबाबत परीपत्रक शासनाने निर्गमित केले होते परंतू सदरच्या परिपत्राविरूध्द मा. उच्च न्यायालयात रीट याचीका क्र. 95629/2020 व इतर याचिकामध्ये शासनाची संबंधीत परीपत्रक आव्हानीत करण्यात आले होते व दि. २६/०६/२०२१ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये या परीपत्रकावर स्थगन आदेश होते. तद्नंतर दि. ०१ मार्च २०२१ रोजी नमूद याचीका मा. न्यायालयाने अंतिमतः निकाली काढल्या या निर्णयात मा. उच्च न्यायालयाने शासन परिपत्रक पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नसल्याचे स्पष्ट करुन या परीपत्रकापूर्वी शाळांमार्फत फी निश्चित केलेल्या बाबतीत हे परीपत्रक लागू नसल्याचे आदेश दिले आहेत.

**प्रश्न क्रमांक ८,९ १० :-**

समितीने दिनांक २९/०९/२०२१ व ०१/०२/२०२२ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये आर्थिक कारणास्तव विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करू नये, अडथळा आणू नये त्याबाबत प्रतिवादी शाळेमार्फत अंतरिम आदेशाचा भंग झाला असल्यास त्याची सत्य परिस्थिती तपासून अथवा शहानिशा करून संबंधित शिक्षण निरीक्षक यांना स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून समितीने अंतरिम आदेश दिलेला होता. या आदेशान्वये समितीने प्रतिवादी शाळा यांना थकित फी या कारणास्तव विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करू नये असा अंतिम आदेश दिला होता. तोच आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत असून प्रतिवादी

शाळेने अर्जदार यांचे पाल्याची शैक्षणिक फी भरली नाही अथवा स्थकित राहिली या कारणास्तव त्यांच्या पाल्याचे शिक्षण यापुढे बंद करण्यात येवू नये व फी थकबाकी संदर्भात प्रतिवादी शाळेसमक्ष वाजवी कारण असल्यास फी वसूली संदर्भात विद्यार्थ्याचे शिक्षण परस्पर बंद करण्यापूर्वी प्रथम इतर पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग यांनी वरील आदेशांची पूर्तता होणेबाबत पर्यवेक्षण करून निवेदनकर्ते यांचे पाल्यांचे शिक्षणात बाधा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच अर्जदार यांनी प्रतिवादी मार्फत निश्चित केलेली फी बेकायदेशीर ठरवून मिळणेबाबत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 विहीत केलेल्या समिती समक्ष पात्र पालक प्रतिनिधी मार्फत नियमान्वये दाद मिळवून प्रतिवादी मार्फत निश्चित केलेली फी कायदेशीर अथवा बेकायदेशीर ठरवून उचित दाद मागावी. शाळेमार्फत निश्चित केलेली फी कायदेशीर अथवा बेकायदेशीर ठरवून देण्याचे आदेश या समितीला नाहीत.

**<u>प्रश्न क्रमांक ७, ११ :-</u>**

कोविड-१९ या कारणास्तव शाळा बंद असताना प्रतिवादी शाळेमार्फत इतर खर्च तसेच तद्अनुषंगिक खर्च इ. खर्च वसूल केले जात असल्याचे समिती समक्ष निवेदन होते.

१. कोविड-१९ परिस्थिती दरम्यान पालकांचे आर्थिक समस्येबाबत विचारात घेवून शासनामार्फत शालेय फी वसूलीबाबत शाळांना सहानुभूतीपूर्वक विचारात घेवून फी भरण्यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. त्यात टप्प्याटप्प्याने शालेय फी भरणे, ऑनलाईन शालेय फी भरण्याची सुविधा उपलब्ध करून देणे इ. बाबी त्यात समाविष्ट होत्या. असे असताना देखील प्रतिवादी संस्थेने पालकांची आर्थिक समस्या विचारात घेवून कोणतीही उपाययोजना अथवा सहानुभूती प्रतिवादी शाळेमार्फत करण्यात आली नसल्याचे निवेदन कर्त्यांचे म्हणणे आहे. तसेच

प्रतिवादी शाळा ही विनाअनुदानित स्वरुपाची असून फी वसूली ही आर्थक लाभ, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देताना आर्थिक लाभाचा उद्देश ठेवून केली जात असल्याचा तक्रारदार यांचे म्हणणे आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी संस्थेने 325 करोड रुपये आर्थिक लाभ मिळविले असल्याचे तक्रारीत सादर केले आहे. ऑडिट रिपोर्टच्या आधारे तक्रार समिती समक्ष सादर केली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणू या आजाराला जागतिक महामारी म्हणून घोषित केले होते. या आजाराच्या संसर्ग व प्रतिबंध करण्यासाठी राज्यशासनाने संबंध राज्यात दरम्यान कालावधीत लॉकडाऊन सुरू केले होते. या कारणास्तव राज्यातील दैनंदिन कामकाज बाधित होवून नागरिकांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागले होते. कारोना साथीची गंभीर परिस्थिती असताना संस्था, शाळा यांची फी पालकांना आर्थिक अडचणीस्तव पूर्णपणे वेळेवर भरण्यास अडचणीचे जात होते. अशी परिस्थिती असताना काही शाळांकडून विद्यार्थ्यांकडून संपूर्ण शैक्षणिक वर्षाची फी सक्तीने वसूल करणेबाबत व ती न भरल्यास त्यांना शिक्षणापासून बाधित ठेवलेबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. वरील उद्भवलेल्या असाधारण परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे थकित फी या कारणास्तव नियमित शिक्षण बाधित होवू नये याकरिता शैक्षणिक संस्थांना शालेय फीमध्ये वाढ करू नये, शैक्षणिक फी एकदाच एकत्रित भरण्याबाबत जबरदस्ती करू नये अथवा त्या कारणास्तव विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित होवू नये इत्यादी आव्हान करण्यात आले होते. परंतु कोविड आजाराची असाधारण परिस्थिती राज्यभरात असताना काही शैक्षणिक संस्थांमार्फत थकित फी या कारणास्तव विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षणास बाधा आणली गेली अशा तक्रारी या निवेदन कर्त्यांप्रमाणेच प्राप्त झालेल्या आहेत. वरील असाधारण परिस्थिती असताना संस्थेने विद्यार्थी व पालकांना कोणतीही सूट सहानुभूतीपूर्वक उपलब्ध करून न देता उलट या कालावधीत तथाकथित बेकायदा फी दरवाढ करून विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित करून या कालावधीत संस्थेने शिक्षण हा आर्थिक लाभाचा मार्ग अवलंबल्याचे

तक्रारदार यांचे आरोप हे गंभीर स्वरुपाचे आहेत. या विरुद्ध श्री. नितीन दळवी व प्रस्तुत निवेदन कर्ते यांनी मा. उच्च न्यायालयात या असाधारण परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे हीत विचारात घेवून दाद मागितली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाचे आदेशाच्या अनुषंगाने या समिती समक्ष वरील बाबींवर दाद या समिती समक्ष मागितली आहे. प्रस्तुत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशात प्रतिवादी शाळा व संस्था यांची उपस्थिती असताना मा. न्यायालयाचे निर्देश असताना त्यास प्रतिवादींनी या समितीस अधिकार नसलेबाबत कुठलाही आक्षेप नोंदविला नाही. तसेच या समितीला उपरोक्त संदर्भ क्र. 3 शासन आदेशान्वये प्राप्त तक्रारीवर सर्व संबंधितांना उचित संधी देवून आदेश व निर्णय घेण्याचे अधिकार असताना कोरोना या असाधारण परिस्थतीत विद्यार्थ्यांच्या समस्येबाबत शाळा व संस्थेने आपली बाजू मांडण्याचे कुठलेही औचित्य दाखविले नाही. तसेच निवेदन कर्त्यांनी या असाधारण परिस्थितीत संस्थेमार्फत आर्थिक लाभाची फी वसूल केली जात असल्याबाबतच्या आरोपावर कुठलाही विरोध अथवा स्पष्टीकरण समिती समक्ष सादर केलेले नाही. निवेदन कर्ता यांनी उल्लेख केलेल्या फी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्याची अंमलबजावणी प्रतिवादी संस्थे/शाळा मार्फत केली जाते किंवा नाही या बाबी देखील सुनावणी समक्ष उपलब्ध झालेल्या नाहीत. प्रतिवादी संस्था ही शासन मान्यता प्राप्त शाळा असून प्रतिवादी यांना शासनाचे वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे व कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे.

तरी कोविड या असाधारण परिस्थितीत शैक्षणिक फी हा आर्थिक लाभाचा मार्ग प्रतिवादी मार्फत बनविल्याचा निवेदन कर्ता यांच्या आरोपावर शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरुन माध्यमिक शिक्षण संहिता विभाग 4 मधील नियम 83 अन्वये शाळेचे फी संबंधी रेकॉर्डस्, रजिस्टर इ. बाबतची तपासणी करून निवेदन कर्ता यांच्या आरोपात तथ्य दिसत असल्यास नियमान्वये प्रतिवादी संस्था/शाळा यांचे विरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

**प्रश्न क्रमांक १२ :-**

प्रतिवादी शाळा ही विना अनुदानित स्वरुपाची असून तिचे फी निश्चितीकरण महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्यान्वये ठरते.

**आदेश**

१. थकित फी या कारणास्तव प्रतिवादी शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करू नये असा अंतरिम आदेश समितीने दिनांक 29/09/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रतिवादी संस्थेस दिला होता तोच आदेश यापुढेही कायम करण्यात येत असून प्रतिवादी शाळेमार्फत थकित फी या कारणास्तव विद्यार्थ्यांचे शिक्षण परस्पर बंद करण्यापूर्वी इतर पर्यायी मार्गांचा अवलंब करण्यात यावा.

२. प्रतिवादी यांनी निवेदन कर्ते यांना सन 2020-21 व 2021-22 या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्यान्वये विहित केलेल्या प्रक्रियान्वये निश्चित केलेले फीचे दरपत्रक/इतिवृत्त निवेदन कर्ते यांना हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यात उपलब्ध करून द्यावे व ती फी निवेदन कर्ते यांनी प्रतिवादी संस्था/शाळा यांनी सदर दरपत्रक प्राप्त झाल्यापासून संस्थेने दिलेल्या मुदतीत, टप्प्यात भरणेबाबत उचित कार्यवाही करावी.

३. प्रतिवादी संस्थे/शाळा मार्फत प्राप्त फी निश्चित दरपत्रक / इतिवृत्त निवेदन कर्ते यांना मंजूर नसल्यास महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम 2011 या कायद्यात विहित केलेल्या समिती समक्ष या कायद्यात नमूद केलेल्या "aggrieved parents group" यांनी नियमान्वये दाद मागून सदर फी कायदेशीर अथवा बेकायदेशीर ठरवून उचित दाद फी दरपत्रक / इतिवृत्त प्राप्त झाल्याच्या एक आठवड्याच्या आत दाद मागावी. सदर दाद aggrieved parents group यांनी (शुल्क विनियम) अधिनियम 2011 कायद्यान्वये मागितल्याची सूचना प्रतिवादी

यांना प्राप्त झाल्यास प्रतिवादी शाळेने या कायद्यात विहित केलेली फी व्यतिरिक्त अतिरिक्त फी वसूलीची कार्यवाही या कायद्यान्वये गठीत समिती समक्ष प्रथम सुनावणीच्या तारखेपर्यंत करण्यात येवू नये.

४. प्रतिवादी संस्था/शाळेने या आदेशान्वये फी निश्चिती दरपत्रक निवेदन कर्ते यांना दिल्यापासून एक आठवड्याच्या कालावधीच्या आत कोणतीही फी वसूलीसंबंधी सक्तीची कार्यवाही संबंधित पाल्यांवर करण्यात येवू नये.

५. वरील 1, 2 व 4 या आदेशांची पूर्तता होणेबाबत शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग यांचेमार्फत पर्यवेक्षण करण्यात यावे.

६. कोविड या असाधारण परिस्थितीत शैक्षणिक फी हा आर्थिक लाभाचा मार्ग प्रतिवादी मार्फत बनविल्याचा निवेदन कर्ता यांच्या आरोपावर शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरुन लेखाधिकारी व इतर अधिकारी यांचे समावेशासह विशेष पथक गठीत करून माध्यमिक शिक्षण संहिता विभाग 4 मधील नियम 83 अन्वये शाळेचे फी संबंधी रेकॉर्डस्, रजिस्टर इ. बाबतची तपासणी करून निवेदन कर्ता यांच्या आरोपात तथ्य दिसत असल्यास नियमान्वये प्रतिवादी संस्था/शाळा यांचे विरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

येणे प्रमाणे आदेश / निर्देशांची अंमलबजावणी करण्यात आली.

(शेषराव बडे)
सदस्य सचिव
तक्रार निवारण समिती

(नितीन उपासनी)
अध्यक्ष
तक्रार निवारण समिती

प्रत :-

१. श्री. जितेंद्र कदम, श्री. नितीन रमेश दळवी व इतर
१३२/बी.२/९, दामोदर हरिदास बिल्डिंग, टी.एच. कटारिया मार्ग, माहिम, मुंबई-
४०० ०१६.

२. मुख्याध्यापक / प्राचार्य
आय.ई.एस. मॉडर्न इंग्लिश स्कूल, दादर, मुंबई-२८

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव**

शिक्षण निरीक्षक
दक्षिण विभाग, मुंबई यांना निर्देशान्वये कार्यवाहीस्तव